# पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि दिनांक २३/०६/२०२२ च्या सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारीत तरतुदींनुसार **पोलीस अधिक्षक, चंद्रपुर** यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई १३७+९=१४६ (९ बॅण्डस्मॅन) यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीव्दारे **दिनांक ०५/०३/२०२४ ते ३१/०३/२०२४** या कालावधीत स्विकारण्यात येतील. ह्या बाबतची सविस्तर माहीती policerecruitment२०२४.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलीस अधीक्षक, चंद्रपुर यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment२०२४.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरिता संपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.
- पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी परीक्षा घेण्यात येईल व त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही **सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजीत करण्यात येईल, त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.**
- **भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारीरिक चाचणी घेण्यात येणार आहे. शारिरीक योग्यता चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवारांमधुन संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदाच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणाची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्केपेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.**
- **सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.**
- **शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमुद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांमधुन एक गुणवत्तायादी तयार केली जाईल.** तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसुचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसूचीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. **शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रीकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दि. १०/१२/२०२० नुसार अंतिम गुणवत्तायादी तयार करण्यात येईल.**
- पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणीक अर्हता, शारिरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहीती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहीती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सुचना policerecruitment२०२४.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. **सदरहु जाहिरात उमेदवरांनी काळजीपुर्वक वाचुन, समजून घ्यावी. तसेच सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथांकरीता उपलब्ध पदांच्या १% आरक्षित जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.**

- **भरती प्रक्रियेदरम्यान शारिरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास, त्यास भरती प्रक्रियेतुन बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परीस्थितीत बदल करण्यात येणार नाही.**
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतु खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.
- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्ण याचिकांमध्ये दिनांक २७/०६/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहीती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

(मुम्मका सुदर्शन)
पोलीस अधिक्षक, चंद्रपुर

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०२२-२०२३
## पोलीस अधिक्षक, चंद्रपुर

जाहिरात क्रमांक :- पोअचं/एसबी-१/पो.भ.२०२२-२३/प्रक्रिया/२०२४, चंद्रपुर दिनाक ०१/०३/२०२४

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक २३.०६.२०२२ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणांनुसार **पोलीस अधिक्षक, चंद्रपुर** यांच्या आस्थापनेवर सन २०२२- २०२३ **मध्ये** पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी पोलीस शिपाई १३७ + ९ =१४६ (९ पदे बॅण्डस्मॅन) पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

**१) पोलीस शिपाई**

| | अ.जा. | अ.ज. | वि.ज.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | इडब्लुएस | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | ३० | १८ | ० | ०१ | ० | ०३ | ०१ | ४५ | २० | १९ | ०० | १३७ |
| कप्पीकृत आरक्षण⬇ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| सर्वसाधारण | ६ | ५ | ० | १ | ० | २ | १ | १४ | ६ | ५ | ० | ४० |
| महिला | ९ | ५ | ० | ० | ० | १ | ० | १४ | ६ | ६ | ० | ४१ |
| खेळाडु | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ० | ७ |
| प्रकल्पग्रस्त | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ० | ७ |
| भुकंपग्रस्त | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | २ |
| माजी सैनिक | ५ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ७ | ३ | ३ | ० | २१ |
| अंशकालीन पदवीधर | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ० | ७ |
| पोलीस पाल्य | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ० | ५ |
| गृहरक्षक दल | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ० | ७ |
| अनाथ | महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ २०२२/प्र.क्र.१२२का-०३, दिनांक ०६/०४/२०२३ मधील तरतुदीनुसार एकुण रिक्त पदाच्या १% म्हणजेच १ पद | | | | | | | | | | | |

**बॅण्डस्मॅन रिक्त पदे :-** वरील पदा व्यतीरीक्त चंद्रपुर जिल्हात बॅण्डस्मॅन संवर्गात एकुन **०९** पदे **खुल्या प्रवर्गात** रिक्त आहेत.

**टिप :-** दिनांक ३१/१२/२०२३ रोजीच्या स्थितीची बिंदुनामावली प्रमाणीत करण्याच्या अटीवर.

**महत्वाची टिप :-**

जिल्हा पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबधीत उमेदवराने त्याबाबतची माहिती ॲन्टीकरप्शन ब्युरो,चंद्रपुर यांना दुरध्वणी **क्रमांक** ०७१७२-२५०२५१ वर त्वरीत संपर्क साधुन तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस अधिक्षक, चंद्रपुर या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती - २०२२-२०२३ तथा पोलीस अधिक्षक, चंद्रपुर यांच्याशी संपर्क साधून तक्रार करु शकतील.

उमेदवारांना काही अडचणी आल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | दुरध्वणी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १ | पोलीस अधिक्षक, चंद्रपुर | मो. क्र. ८९७५३००२००, ८९७५११०५५<br>दुरध्वणी क्रमांक ०७१७२-२५५१०० |

(मुम्मका सुदर्शन)
पोलीस अधिक्षक, चंद्रपुर